**ठळक बातम्या**

- राज्याचं सध्याचं कर्ज सुरक्षित मर्यादेच्या आत असल्याचं अर्थमंत्री अजित पवार यांचं विधानसभेत स्पष्टीकरण

- विकसित भारत विकसित महाराष्ट्र हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आगामी ५ वर्षांचा विचार करून हा अर्थ संकल्प सादर केला असल्याचं प्रतिपादन

- बीड जिल्ह्यातल्या शिक्षक आत्महत्येप्रकरणी संबंधित संस्थाचालकावर गुन्हा दाखल करण्याची विरोधी पक्षनेत्यांची विधानपरिषदेत मागणी

**आणि**

- विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीत पाच जागांसाठी ६ अर्ज दाखल

**<><><><><>**

राज्याचं सध्याचं कर्ज सुरक्षित मर्यादेच्या आत आहे, अशी माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिली. ते आज विधानसभेत अर्थसंकल्पावरच्या चर्चेला उत्तर देत होते. गेल्या १५ वर्षात राज्याचं स्थूल उत्पन्न आणि एकूण कर्ज दोन्ही वाढत गेलं आहे. कर्जाचं स्थूल उत्पादनाशी प्रमाण १६ ते १९ टक्के आहे. २५ टक्क्यापर्यंत आपण कर्ज देऊ शकतो. देशातल्या केवळ ३ राज्यांचं कर्जाचं प्रमाण २० टक्क्यांपेक्षा कमी आहे. त्यामुळे सध्याच्या आर्थिक स्थितीबाबत निराधार आरोप करून राज्याची आर्थिक परिस्थिती खालावल्याचं खोटं चित्र रंगवू नका. त्याचा येणाऱ्या गुंतवणुकीवर थोडा का होईना, परिणाम होतो, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

विकसित भारत विकसित महाराष्ट्र हे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने आगामी ५ वर्षांचा विचार करून यंदाचा अर्थ संकल्प सादर केला आहे. शेती, उद्योग, पायाभूत सुविधा, रोजगार आणि सर्व घटकांचा विकास डोळ्यासमोर ठेवले आहे, असं

प्रतिपादन उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी केलं. अर्थसंकल्पावरील चर्चेला ते विधानसभेत उत्तर देत होते.

राज्याच्या आणि विविध समाज घटकांच्या हिताच्या योजना बंद करणार नाही. पण गरज संपलेल्या, द्विरुक्ती असलेल्या योजना सरकार बंद करेल. त्यासाठी निधी दिलेला नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. लाडकी बहिण योजना सुरू ठेवताना त्यात दुरुस्ती करण्याची सरकारची भूमिका आहे. दुरुस्ती करताना गरीब महिलांना फायदे मिळत राहतील असं त्यांनी यावेळी नमूद केलं.

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या हितासाठी अनेक योजना सरकारने आणल्या आहेत. शेतकऱ्यांसाठी शून्य टक्के दराने कृषी कर्ज देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे असं आश्वासन अजित पवार यांनी दिलं. वंचितांसाठी सरकारने भरीव तरतूद केली आहे. महसुल वाढीसाठी आणि खर्च कमी करण्यासाठी सरकारने अनेक प्रयत्न केले आहेत. त्याच वेळी राज्याच्या विविध भागाच्या अनुशेषामध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक घट झाल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी क्रांतिसिंह नानासिंह पाटील यांचे स्मारक सांगली जिल्ह्यात उभारले जाईल. नवी दिaल्लीत मराठी भाषिक नागरिकांसाठी सांस्कृतिक भवन उभारण्याची घोषणा अर्थमंत्र्यांनी आज केली. राज्यातील जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ देणार नाही आणि राज्याच्या विकासाच्या शिखरावर नेण्याचा संकल्प पूर्ण करू असं आश्वासन त्यांनी आज दिलं.

**<><><><><>**

सिंधुदुर्ग जिल्ह्यात मालवण इथल्या राजकोट किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांचा ६० फूट उंचीच्या पुतळ्याचं काम राज्य सरकार पूर्ण करत असून लवकरच त्याचं लोकापर्ण केलं जाईल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत सांगितलं. आमदार निलेश राणे यांनी महाराजांच्या स्मारकासंदर्भात विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर देताना पवार यांनी माहिती दिली.

**<><><><><>**

भारतीय कापूस महामंडळामार्फत सुरू असलेली कापूस खरेदी पारदर्शकपणे व्हावी यासाठी राज्यशासन प्रयत्नशील असून आत्तापर्यंत राज्यात १२४ केंद्रांमार्फत १४२ कोटी ६९ लाख क्विंटल इतकी कापूस खरेदी करण्यात आली आहे, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी या संदर्भातल्या प्रश्नाच्या उत्तरात दिली. या संदर्भातील प्रश्न अमित झनक यांनी उपस्थित केला होता. कापसाच्या खरेदीसाठी भावांतर योजना लागू करावी असा आग्रह विरोधी पक्षाच्या सदस्यांनी धरला होता. खुल्या बाजारातले व्यापारी देखील या केंद्रामधून कापूस खरेदी करत आहेत त्यामुळे भावांतराचा विषय उद्भवत नाही. सीसीआयने लांब धाग्याच्या कापसाला ७ हजार ५२१ रुपये हा हमीभाव दिला आहे अशी माहिती देखील रावल यांनी यावेळी दिली.

सध्या अस्तित्वात असलेली ३२५ गोदामं कमी पडत असल्याने आणखीन गोदामे मिळवण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे, अशी माहिती देखील त्यांनी यावेळी दिली. १५ मार्चपर्यंत नोंदणी झालेल्या सगळ्यांची कापूस खरेदी करण्यात येईल आणि ही मुदत वाढवण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रयत्न करण्यात येतील असं आश्वासन रावल यांनी यावेळी दिली.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या केज इथले शिक्षक धनंजय नागरगोजे यांनी संस्थाचालकाच्या छळाला कंटाळून आत्महत्या केली, त्यामुळे संबंधित संस्थाचालकावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी विधानपरिषदेत केली. तसंच विना अनुदानित शाळांमधल्या शिक्षकांना वेतन देणं संस्थाचालकांना बंधनकारक करावं अशी सूचना केली. या प्रकरणाची सखोल चौकशी करून कारवाई केली जाईल असं गृहराज्यमंत्री पंकज भोयर यांनी सांगितलं.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची मुगल शासक औरंगजेब याच्याशी तुलना केल्याबद्दल भाजपा नेते प्रवीण दरेकर

यांनी विधानपरिषदेत निषेध केला. हा महाराष्ट्राचा अपमान असून सपकाळ यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी दरेकर यांनी केली. यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल असं सभापती राम शिंदे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्य विधान परिषदेच्या पोटनिवडणुकीसाठी अर्ज भरायचा आज शेवटचा दिवस आहे. भाजपकडून संजय केणेकर, दादाराव केचे आणि संदीप जोशी यांनी आज आपले अर्ज दाखल केले. राष्ट्रवादी काँग्रेसचे संजय खोडके आणि शिवसेनेचे चंद्रकांत रघुवंशी यांनीही अर्ज भरला. तर अपक्ष उमेदवार उमेश म्हेत्रे यांनीही अर्ज दाखल केला आहे. ही निवडणूक २७ मार्च रोजी होणार आहे आणि त्याचदिवशी संध्याकाळी ५ वाजता मतमोजणी होईल. आमश्या पाडवी, प्रवीण दटके, राजेश विटेकर, रमेश कराड आणि गोपीचंद पडळकर हे विधानसभेत निवडून आल्यानं रिक्त झालेल्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे.

**<><><><><>**

छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी संबंधित स्थळांचा विकास करुन, त्यांच्या कार्याची प्रेरणा आपण घेत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. ठाणे जिल्ह्यातल्या भिवंडी इथं आज छत्रपती शिवाजी महाराज मंदिराचं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. ही स्थळं आहेत, म्हणून आपल्यामध्ये स्वाभिमान असल्याचं सांगून मुख्यमंत्र्यांनी, या स्थळांच्या विकासासंबंधी माहिती दिली. या मंदिराला तीर्थस्थळाचा दर्जा देण्याची घोषणा करतानाच मुख्यमंत्र्यांनी, या मंदिराच्या विकासासाठी शासनाकडून सर्व प्रकारचं सहकार्य करण्याचं आश्वासन दिलं.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात ग्रामीण भागातल्या ५८ हजार ६६२ महिलांनी लखपती दीदी अभियानाच्या माध्यमातून आपलं वार्षिक उत्पन्न लाखाच्या पुढे नेलं आहे.

शेतीपूरक व्यवसाय, अन्नप्रक्रिया, दुग्धव्यवसाय, लघुउद्योग आणि सेवा क्षेत्रात या महिलांचं मासिक उत्पन्न १० ते १२ हजारांपर्यंत पोचलं आहे. या योजनेच्या माध्यमातून जिल्ह्यात एकूण ७३ हजार २५५ महिलांना या अभियानात समाविष्ट करण्याचं उद्दिष्ट ठेवण्यात आलं होतं.

<><><><><>

विनोदी साहित्यिक द.मा.मिरासदार यांचे बंधू आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ कार्यकर्ते वि.मा.मिरासदार यांचं आज पंढरपुरात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते.

<><><><><>

मुंबईच्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर चार वेगवेगळ्या घटनांमध्ये सीमा शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी सुमारे १० किलो सोनं जप्त केलं. जप्त केलेल्या सोन्याचं मूल्य ८ कोटी ४७ लाख रुपये असल्याची माहिती आज अधिकाऱ्यांनी दिली. याप्रकरणी खासगी कंपनीच्या तीन कर्मचाऱ्यांसह पाचजणांना अटक केली.

<><><><><>

न्यू इंडिया को ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्यात आणखी एका आरोपीला मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने अटक केली. त्याचं नाव अरुणाचलम मरुथुवर असून त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विविध शहरांमध्ये पथकं पाठवली होती, परंतु तो स्वतःच पोलिसांना शरण आला असून न्यायालयाने त्याला चौकशीसाठी उद्यापर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले आहेत. याशिवाय पोलीस अजून दोन आरोपींच्या शोधात आहेत.

<><><><><>

ठाणे जिल्ह्यात बदलापूर नगरपरिषदेच्या माजी नगरसेवकाला ब्लॅकमेल करत त्याच्याकडून जबरदस्तीनं पैसे वसूल करणाऱ्या चौघांना अटक केल्याची माहिती

पोलिसांनी आज दिली. एका महिलेसोबतचा आक्षेपार्ह फोटो माजी नगरसेवकाला या चौघांनी पाठवला होता. हा फोटो समाज माध्यमावर टाकण्याची बदनामीची धमकी देत नगरसेवकाकडे ५० लाख रुपयांची मागणी केली. याप्रकरणी माजी नगरसेवकानं पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

**<><><><><>**

सोलापूर जिल्ह्यात छत्रपती संभाजी तलाव आणि किल्ला परिसरात एका कावळा आणि बगळ्याचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या नमुना चाचणीत बर्ड फ्लू आढळल्यानंतर हा परिसर महनगर पालिकेनं बर्ड फ्लू बाधित क्षेत्र म्हणून घोषित केलं आहे. तसंच बर्ड फ्लू संसर्ग प्रतिबंधासाठी सर्व विभागांनी दिलेल्या सूचनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या सुचना जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिले आहेत.

**//<><><><><>//**